CMYK

रुग्णाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या कर्मचाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर >> पान 2

चिमुकल्या बहिणींच्या अत्याचार अन् हत्येने पुणे हादरलं >> पान 3

आमदार मनोज कायंदे यांचा एक कॉल आणि मॅटर सॉल >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ




माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे 'सिकंदर'चं टीझर रिलीज लांबणीवर

आतील पान

**सुविचार**

ज्ञानाची खरी परीक्षा त्याचा योग्य वापर करण्यात आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 137 ■ शनिवार, दि. 28 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# शिक्षकांचा पगार लांबणीवर?

## लाडकी बहीण योजनेमुळं तिजोरीवर भार? दोन ते तीन दिवस प्रतीक्षा करावी लागणार



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी : राज्यातील शिक्षकांचा डिसेंबर महिन्याचा पगार उशिरानं होण्याची शक्यता आहे. नवीन वर्षात शिक्षकांचे पगार उशिरानं होण्याची शक्यता आहे. दरमहिन्याला होणारा पगार दोन ते तीन दिवसांनी उशिरानं होण्याची शक्यता आहे. नव्या वर्षात शिक्षकांचे पगार उशिरानं होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नव्या वर्षात शिक्षकांना पगारासाठी वाट पाहावी लागू शकते. यासंदर्भातील एक कारण लाडकी बहीण योजनेनं सरकारवर आलेला आर्थिक भार असल्याचं बोललं जातंय.**

१ ते ५ तारखेदरम्यान राज्यातील शिक्षकांचे पगार होत असतात. यामध्ये प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक आणि निम सरकारी शाळा, सरकारी शाळांच्या शिक्षकांचे पगार त्या कालावधीत होत असतात. पण, त्यासाठी जी सगळी कागदपत्र असतात त्याची पूर्तता १५ तारखेपर्यंत होणं आवश्यक असतं. त्यानंतर रक्कम मिळत असते. योजनांवरील खर्चाच्या तरतुदी करण्यात येत असल्यानं शिक्षकांच्या पगारासंदर्भातील तरतूद काल करण्यात आल्याची माहिती आहे. म्हणूनच शिक्षकांचा पगार जो १ ते ५ तारखेपर्यंत होत असतो तो उशिरानं होऊ शकतो. म्हणजेच नववर्षात २ ते ३ दिवस उशिरानं शिक्षकांचा पगार होऊ शकतो.

शिक्षण विभागाची धावपळ सुरु

नवीन वर्षात शिक्षकांचे पगार दोन ते तीन दिवसांनी उशिरा होण्याची शक्यता आहे. लाडक्या बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरी वर आर्थिक भार आल्याने शिक्षकांच्या पगारासाठीची तरतूद रखडली होती. रात्री उशिरा ही रक्कम वर्ग करण्यात आली आहे. नेहमी १५ तारखेपर्यंत शिक्षकांच्या पगाराची रक्कम वर्ग करण्यात येते. डिसेंबरचा लाडक्या बहीण योजनेचा हप्ता द्यायचा असल्याने यासाठी उशीर झाल्याची माहिती आहे. लवकरात लवकर पगार करण्यासाठी आता शिक्षण विभागाची धावपळ सुरू आहे.

सोलापूरमध्ये १३ हजार शिक्षकांचा पगार रखडणार

नववर्षाच्या सुरुवातीलाच सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक विभागातील जवळपास १३ हजार शिक्षकांचे पगार एक तारखेला होणार नाहीत. १३ हजार शिक्षकांसाठी जवळपास ९० कोटी रुपये पगार साठी लागत असतात. साधारणपणे पगाराची रक्कम २० तारखेला वेतन अधीक्षकांना प्राप्त होतो. त्यानंतर प्रक्रिया करून एक तारखेपर्यंत हे पगार शिक्षकांना दिले जातात. मात्र, २७ डिसेंबरपर्यंत अद्याप राज्य शासनाच्या वतीने हे पगार जमा करण्यात आलेले नाही. तसेच पुढील दोन ते तीन दिवस बँकांना सुट्टी असणार आहे. त्यामुळे जरी शासनाच्या वतीने आज हा निधी जमा झाला तरी एक तारखेला शिक्षकांना पगार मिळणार नाही. नव्या वर्षाच्या सुरुवातीला माध्यमिक विभागात शिकवणाऱ्या शिक्षकांना पगारासाठी चार ते पाच दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगाच्या सरपंचावर जीवघेणा हल्ला




दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव /प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण गाजत असताना धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यामधील मेसाई जवळगा येथील सरपंच नामदेव निकम यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला आहे. सरपंच नामदेव निकम तुळजापूर येथून काल संध्याकाळच्या सुमारास त्यांच्या गावी जात होते. यावेळी दोन मोटरसायकलस्वारांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग करत दगड, पेट्रोलचे गोळे व अंडी फेकून मारली आहेत. या प्रकरणी तुळजापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. यातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल असे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी सांगितले आहे.

## शिक्षकांच्या विरोधात आमदार प्रशांत बंब आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** शिक्षण विभागातून एक धक्कादायक अहवाल समोर आला तो असा की मराठवाड्यातील काही जिल्ह्यातील ३० टक्के शिक्षकांना मराठी देखील वाचता येत नाही. या अहवालानंतर गंगापूरचे आमदार प्रशांत बंब यांनी जिल्हा परिषदच्या शिक्षकांवर चांगलाच संताप यावेळी व्यक्त करण्यात आला. प्रशासन एकीकडे याच शिक्षकांना लाखभर पगार देत हेच शिक्षक मुक्कामी राहत असून ते शहरी भागामध्ये राहतात तर दुसरीकडे दहा ते पंधरा हजार रुपये पगारावर खाजगी शिकवणी मध्ये शिक्षक काम करतात त्या शिक्षकांचा रिझल्ट चांगला येतो मग लाखभर पगार दिलेल्या शिक्षकांचा रिझल्ट असा का असा प्रश्न उपस्थित करत मी माझ्या मतदारसंघात दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्नशील राहील अशी प्रतिक्रिया आमदार प्रशांत बंब यांनी दिली आहे.

## ६ हजार रुपये किमतीचे १२ नायलॉनचे बंडल जिन्सी पोलिसांनी केले जप्त, यापुढेही विक्रेत्यांवर होणार गुन्हे दाखल



**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** : संक्रांत दिन अवघ्या काही दिवसांवर आला असताना पतंग विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे.मात्र बंदी असलेला नायलॉन मांजा विक्री होत असल्यामुळे दुखापत होण्याच्या घटना वाढल्या आहेत. याप्रकरणी जीनसी पोलिसांनी आज ६ हजार रुपये किमतीचा नायलॉन मांजा जप्त केला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक रामेश्र्वर गाडे यांनी दिली .

## मनमोहन सिंग यांच्या पार्थिवाचे पंतप्रधान मोदींनी घेतले अंतिमदर्शन, सात दिवसांचा देशात 'राष्ट्रीय दुखवटा'

नवी दिल्ली : माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे गुरुवारी वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ केंद्र सरकारकडून सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. या वर्षी एप्रिलमध्ये मनमोहन सिंग राज्यसभेतून निवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी गुरशरण कौर आणि तीन मुली असा परिवार आहे.

राष्ट्रीय दुखवट्याच्या दिवशी संपूर्ण देशात राष्ट्रीय ध्वज हा सर्व इमारतींवर अर्ध्यावर फडकला जाईल. राष्ट्रीय दुखवट्याच्या काळात सरकारकडून कोणतेही अधिकृतपणे मनोरंजनाचे कार्यक्रम होणार नाहीत. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर संपूर्ण शासकीय इतमामात अंतिमसंस्कार करण्यात येणार आहेत. केंद्र सरकारनं आजचे सर्व सरकारी कार्यक्रम रद्द केले आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळाची सकाळी ११ वाजता बैठक होणार आहे.

पंतप्रधान पदासह केंद्रीय अर्थमंत्री म्हणून मोलाची कामगिरी– मनमोहन सिंग यांनी २००४ ते २०१४ पर्यंत देशाचे पंतप्रधान म्हणून कार्य करताना सर्व शिक्षा अभियान, वनाधिकार कायदा यासारखे महत्त्वाचे निर्णय घेतले. केंद्रीय अर्थमंत्री म्हणून त्यांनी घेतलेल्या उदारीकरणाच्या निर्णयामुळे १९९० नंतरच्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. पी.व्ही. यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये देशाचे अर्थमंत्री म्हणून मनमोहन सिंग यांनी अर्थव्यवस्थेत व्यापक सुधारणा घडवून आणल्यानं भारतानं अर्थव्यवस्थेत भरारी घेतली.



शेड्यूल अद्याप निश्चित झालेले नाही. त्यांची मुलगी परदेशातून येत आहे. ती दुपार आणि संध्याकाळपर्यंत पोहोचेल. त्यानंतर सर्व काही ठरवले जाईल. उद्या अंतिमसंस्कार होऊ शकतात– काँग्रेस नेते, संदीप दीक्षित

शनिवारी पार्थिवावर होणार अंतिमसंस्कार– ''माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी अंतिमसंस्कार होणार आहेत. आम्ही अधिकृतपणे घोषणा करणार आहोत,'' असे काँग्रेसचे सरचिटणीस काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी गुरुवारी उशिरा रात्री दिल्लीत माध्यमांना सांगितले. डॉ. मनमोहन हे एम्समध्ये नेण्याआधी घरी अचानक बेशुद्ध पडले होते. एम्सच्या माहितीनुसार मनमोहन सिंग यांना एम्समध्ये रात्री ८ वाजून ६ मिनिटाला दाखल करण्यात आले. रात्री ९ वाजून ५१ मिनिटाला त्यांना मृत घोषित करण्यात आले.

काँग्रेस स्थापनेचे सर्व कार्यक्रम रद्द– २८ डिसेंबर रोजी काँग्रेसचा स्थापना दिन आहे. या दिवशीचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. डॉ.मनमोहन सिंग यांचे पार्थिव गुरुवारी रात्री उशिरा एम्समधून त्यांच्या ३ मोतीलाल नेहरू मार्गावरील निवासस्थानी पोहोचले. त्यांचे पार्थिव अंतिमदर्शनाकरिता ठेवण्यात येणार आहे. काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, खासदार प्रियांका गांधी वड्रा, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी डॉ. सिंग यांच्या निवासस्थानी रात्री उशिरा भेट दिली.

## 'संवाद अर्धवटच राहिला, नंतर फोनच लागला नाही' हिंगोलीचा तरुण अभियंता इराणमध्ये बेपत्ता

**हिंगोली/प्रतिनिधी :** हिंगोलीच्या वसमत येथील पांचाळ कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. योगेश पांचाळ हे इंजिनिअर असून ते कामानिम्मित इराणला गेले होते. मात्र, गेल्या २० दिवसांपासून त्याच्याशी संपर्कच होत नाहीये. त्यामुळं कुटुंब चिंतेत आहेत. माझ्या पतीला मायदेशी परत आणा, अशी मागणी योगेशच्या पत्नीने केली आहे.

हिंगोलीच्या वसमत येथील योगेश पांचाळ हे इंजिनिअर आहेत. त्यांनी काही महिन्यांपूर्वी श्रीयोग एक्स्पोर्ट नावाची कुलर कंपनी सुरू केली आहे. या कंपनीच्या माध्यमातून आपल्याला काय काय नवीन करता येऊ शकते, याची माहिती घेण्यासाठी योगेश ५ डिसेंबरला इराणला गेला होता. तेहराण येथील येथील हेरिटेज हॉस्टेल येथे तो मुक्कामी थांबला होता.

इराणला गेला असतानाही योगेश आणि त्याची पत्नी श्रद्धाबरोबर त्याचे फोनवर बोलणं होत होतं. मात्र, एकदिवस फोन वर बोलत असतांना इकडे काही तरी बोलणं सुरू आहे. तुला परत कॉल करतो, म्हटला पण आजपर्यंत योगेशचा पुन्हा फोन आला नाहीये. शिवाय इकडून संपर्क केला तर फोन बंद येतोय. त्यामुळे योगेशचे कुटुंबीय चिंतेत सापडले आहेत.

ज्या कंपनीची माहिती घेण्यासाठी योगेश इराणला गेले आहेत. त्याच्या मालकाशी योगेशच्या कुटुंबीयांचा संपर्क झाला असून योगेश नेमका कुठे आहे हे. मात्र अद्याप समजू शकले नाहीये. त्यामुळे योगेशच्या कुटुंबीयांनी भारतीय दूतावासाकडे संपर्क साधला असता भारतीय दूतावासाकडून ही प्रतिसाद मिळत नसल्याचं योगेशच्या पत्नीने म्हटलंय. माझ्या पतीला मायदेशी परत आणा अशी मागणी श्रद्धा भारत सरकारकडे करतेय.

# विसापुरजवळ ५ वर्षांच्या चिमुकलीशी अश्लील चाळे करणाऱ्या पोलीसावर कठोर कार्यवाही करा

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**पुणे :** विसापूर किल्ल्याच्या पायथ्याला मद्यधुंद अवस्थेत चिमुकलीशी अश्र्लील चाळे करणाऱ्या नराधम पोलिसाचे निलंबन करण्यात आले आहे. सचिन सस्ते असे या आरोपी पोलीस कर्मचाऱ्याचे नाव असून त्याला लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बेड्या ठोकलेल्या आहेत. त्याच्यावर पॉक्सोसह अॅट्रॉसिटीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी शिवसेना नेत्या तथा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र मायने आणि पोलीस निरिक्षक धुमाळ यांच्यासोबत चर्चा केली.



पोलीस अधिकाऱ्यांनी डॉ. नीलम गोऱ्हे यांना दिलेल्या माहितीनुसार, 'आरोपी पोलिसाला २५ डिसेंबर रोजी एका दिवसाकरिता बंदोबस्तासाठी पाठवलं होतं. त्याला विसापूरच्या पायथ्याखाली बंदोबस्त दिला होता. यावेळी जेवताना त्याने मद्य प्राशन केले. त्यानंतर लघवीला जातो म्हणून तो तिथून खाली गेला. तिथे चिमुकली खेळत असताना तिला चॉकलेटचे आमिष दाखवले आणि संधीचा फायदा घेत त्याने तिच्यासोबत अश्लील कृत्य केले. घडलेला सर्व गैरप्रकार मुलीने आपल्या आईला सांगितला. या घटनेची तक्रार आल्यानंतर आम्ही तिथे गेलो. त्या पोलिसाला ताब्यात घेतलं. त्याची मेडिकल तपासणी झाली. फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीनुसार कारवाई करण्यात आली आहे.'

याबाबत बोलताना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्यांनी म्हटलं की, लोणावळा खंडाळा परिसर सुप्रसिद्ध पर्यटन क्षेत्र असल्यामुळे अनेक पर्यटकांची येथे रेलचेल असते. या पर्यटकांमध्ये अनेक महिला आणि मुलींचा समावेश असतो त्यामुळे महिला मुख्यत्वे करून लहान मुली यांच्या संरक्षणाकरिता व त्यांना मदतीकरिता महिला पोलिसांची आवश्यकता आहे. तसेच, यथाशक्य बालसमुपदेशक सुद्धा आवश्यक आहे. लोणावळा खंडाळा परिसरामध्ये स्थानिक पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे सुट्टीच्या दिवशी इतर क्षेत्रातील पोलिसांची अतिरिक्त कुमक गस्तीसाठी मागवावी लागते त्यामुळे बाहेरील पोलिसांची मदत घेते वेळेस त्यांची सेवा पडताळणी करणे आवश्यक वाटते. त्याचबरोबर उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्त्री आधार केंद्र, पुणे या संस्थेच्यावतीने २५ हजार रुपयांची मदत पीडित मुलीच्या पालकांना दिली. तसेच, मनोधैर्य योजनेतून अतिरिक्त मदत शासनातर्फे देण्यात येईल अशी ग्वाही सुद्धा दिली.

CMYK

## महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व हरपले

भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांचे गुरुवार दिनांक २६ डिसेंबर रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्यव्यवस्था सुदृढ झाली आहे. डॉ मनमोहन सिंग हे रूढ अर्थाने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृ छत्र हरपले. घरची परिस्थिती हालाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्या वर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान त्यांनी युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लगार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. १९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्र्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टण सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यानच राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंह राव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तींचे नावे सुचवा तेंव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहीतासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माझ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का ? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींनी आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले . देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# रुग्णाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या कर्मचाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**लोणार :** ग्रामीण रुग्णालयात लागलेल्या आगीमुळे व त्या ठिकाणी कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे एका रुग्णास नाहक आपला जीव गमवावा लागला या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून या घटनेस दोषी असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्याकडे फोनवरून माजी आमदार डॉक्टर संजय रायमुलकर यांनी केली आहे.

लोणार येथील ग्रामीण रुग्णालयाला काल सकाळी आग लागली होती या आगीमध्ये रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णाचा जळून मृत्यू झाला, रुग्णाचा मृत्यू कसा झाला याबाबतची माहिती घेण्यासाठी माजी आमदार डॉक्टर संजय रायमुलकर यांनी आज दिनांक २४ डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालयास भेट दिली त्या ठिकाणची परिस्थिती पाहिल्यानंतर रायमुलकर यांचा राग अनावर झाला जवळपास वीस बेड बसतील अशा हॉलमध्ये फक्त एकच रुग्ण उपचारासाठी दाखल होता वास्तविक पाहता रात्रीला ज्या वैद्यकीय अधिकारी , कक्षसेवक, आदी परिचारिका सुरक्षा रक्षक यांची ड्युटी होती, त्यापैकी किती कर्मचारी हजर होते याबाबत सुद्धा त्यांनी शंका व्यक्त केली तसेच रात्रीच्या वेळेस त्या हॉलमध्ये संबंधित कर्मचारी असणे आवश्यक होते, आग लागल्यानंतर तो रुग्ण संपूर्ण जळून कोळसा होईपर्यंत कर्मचारी झोपा काढत होते का असा सवाल त्यांनी त्या ठिकाणी उपस्थित केला.

कामावर हजर असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे काम व्यवस्थित केले असते तर नाहक एका रुग्णास जीव गमवावा लागला नसता ज्यांची ड्युटी होती ते खरंच कामावर हजर होते का, ज्या हॉलमध्ये रुग्ण ठेवण्यात आला होता त्या हॉलमध्ये कर्मचारी होता का, फायर ऑडिट झाले होते का या संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात यावे अशी मागणी माजी आमदार रायमुलकर यांनी फोनवरून राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्याकडे केली आहे.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्राध्यापक बळीराम मापारी म्हणालेकी ग्रामीण भागातील रुग्णांना चांगली सेवा मिळावी म्हणून शासन करोडो रुपयांचा निधी रुग्णालयात देत आहे तसेच अनेक सामाजिक काम करणाऱ्या संघटना व्यक्तींनी व्हेंटिलेटर बेड गाद्या सह अनेक प्रकारचे साहित्य रुग्णालयात दिली आहे.

परंतु लोणार ग्रामीण रुग्णालयाचा कारभार संपूर्णता भोंगळ झाला असून या ठिकाणी कामावर असलेले कर्मचारी सातत्याने विना परवाना गैरहजर राहतात, मनाला वाटेल त्यावेळेस कामावर येतात यांना कोणाची बंधन नसून यांच्या हलगर्जीपणामुळे एका रुग्णाला आपला जीव गमवावा लागला रुग्णाच्या मृत्यूस संबंधित कर्मचारी जबाबदार असून यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी प्राध्यापक मापारी यांनी केली आहे.

यावेळी शिवसेनेचे पांडुरंग सरकटे, युवा सेनेचे तालुकाप्रमुख गजानन मापारी, नगरसेवक डॉक्टर अनिल मापारी, माजी शहर प्रमुख अशोक वारे, मेहकर शिवसेना उपतालुकाप्रमुख समाधान साबळे युवा सेनेचे शैलेश सरकटे, गुलाब सरदार, शिवसेना शहर उपाध्यक्ष देवा चौधरी सह शिवसैनिक प्रामुख्याने हजर होते

## माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे 'सिकंदर'चं टीझर रिलीज लांबणीवर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सलमान खान आज २७ डिसेंबर रोजी आपला ५९वा वाढदिवस साजरा करत आहे. आज सलमानच्या वाढदिवसानिमित्त 'सिकंदर'चे निर्माते एआर मुरुगदास चित्रपटाचा टीझर रिलीज करणार होते. मात्र, २६ डिसेंबर रोजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे टीझर लॉन्चची तारीख बदलण्यात आल्याची घोषणा करण्यात आली आहे. माजी पंतप्रधानांच्या निधनामुळे संपूर्ण जगात शोककळा पसरली आहे. दरम्यान 'सिकंदर'च्या टीझर रिलीजची नवी तारीखही आता घोषित केली गेली आहे. ॲक्शननं भरलेल्या या चित्रपटात सलमान खानचा एक वेगळा अंदाज चाहत्यांना पाहायला मिळणार आहे.

'सिकंदर'चा टीझर आता कधी होणार रिलीज ? : नाडियादवाला ग्रँडसन एंटरटेनमेंट, 'सिकंदर' चित्रपटाचे निर्माते साजिद नाडियादवाला यांनी त्यांच्या एक्स पोस्टवर 'सिकंदर'चा टीझर पोस्ट केल्याची माहिती दिली आहे. सिकंदरचा टीझर आज २७ डिसेंबर रोजी सकाळी ११.०७ वाजता रिलीज होणार होता. दरम्यान एक्सवर 'सिकंदर'च्या निर्मात्यांनी माजी पंतप्रधानांच्या निधनावर शोक व्यक्त करत लिहिलं की, 'आमच्या आदरणीय माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन झाल्यानंतर, आम्हाला जाहीर करताना दु:ख होत आहे की, 'सिकंदर'चा टीझर २८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत रिलीज होईल, या दु:खाच्या प्रसंगी आमचे संवेदना देशाबरोबर आहेत, समजण्यासाठी धन्यवाद, टीम सिकंदर.'

'सिकंदर'ची कधी होईल रिलीज ? : 'सिकंदर'च्या निर्मात्यांनी या चित्रपटाचा टीझर सलमान खानच्या वाढदिवसाला रिलीज करण्याची योजना आखली होती. यापूर्वी निर्मात्यांनी एक दिवस अगोदर २६ डिसेंबरच्या संध्याकाळी 'सिकंदर' चित्रपटातील सलमान खानचा फर्स्ट लुक शेअर शेअर केला होता. त्याचबरोबर आज २७ डिसेंबर रोजी सकाळी ११.०७ वाजता चाहत्यांच्या नजरा या टीझर रिलीजवर खिळल्या होत्या, मात्र दुर्दैवानं डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनानं देशाला मोठा धक्का बसला. माजी पंतप्रधानांना श्रद्धांजली वाहताना, 'सिकंदर'च्या निर्मात्यांनी चाहत्यांना आणखी एक दिवस प्रतीक्षा करण्यास सांगितलं आहे. दरम्यान 'सिकंदर' चित्रपट रुपेरी पडद्यावर मार्च २०२५ मध्ये ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे.

## अबुधाबीहून मुंबईत येणाऱ्या विमानात प्रवाशाकडून धुम्रपान, सहार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** अबुधाबी– मुंबई प्रवासादरम्यान विमानात धुम्रपान करणाऱ्या प्रवाशाविरोधात सहार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फजल मोहम्मद ओट्टा पिलाकुल (२६) असे प्रवाशाचे नाव असून तो केरळम धील रहिवासी आहे. आरोपीविरोधात विमान अधिनियम १९३७ अंतर्गत सहार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. तक्रारदार निमेश सिरोया (३२) हे विलेपार्ले येथील रहिवासी आहेत. ते गेल्या पाच वर्षापासून एका विमान कंपनीत वरिष्ठ सुरक्षा कार्यकारी म्हणून काम करतात. बुधवारी पहाटे अबुधाबी येथून मुंबईला जाणाऱ्या एका विमानाने उड्डाण केले होते. त्यावेळी आसन क्रमांक ३१ सी वरील प्रवासी शौचालयात गेला होता. तो शौचालयातून बाहेर पडल्यानंतर धुम्रपानाचा उग्रवास येऊ लागला. त्यावेळी विमानातील कर्मचारी प्रतिमा यांनी शौचालयात जाऊन पाहणी केली असता तेथे सिगारेटचे थोटूक सापडले. विमानात सर्व प्रवाशांना दिसले अशा ठिकाणी धुम्रपानास मनाई असल्याचे चिन्ह लावण्यात आले होते. तसेच अबुधाबीहून विमान उड्डाण करण्यापूर्वी विमानात धुम्रपान करण्यास मनाई असल्याची घोषणा कर्मचाऱ्यांनी केली होती. त्यानंतरही प्रवासी फजल मोहम्मद ओट्टा पिलाकुल याने विमानात धुम्रपान केले. त्याबाबत विमान कर्मचाऱ्यांकडून विचारले असता फजलने धुम्रपान केल्याचे मान्य केले.












DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# चिमुकल्या बहिणींच्या अत्याचार अन् हत्येने पुणे हादरलं

## शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे राजगुरूनगरमध्ये पोहचल्या

### पीडित मुलींच्या हत्येच्या निषेधार्थ उपोषणास बसलेल्या प्रतिनिधींशी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची चर्चा

### त्वरित दोषारोप पत्र व निकालासाठी प्रयत्नाचे आश्वासन व मनोधैर्य योजना

### डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुढाकाराने पीडित कुटुंबीयांनी केले उपोषण समाप्त

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**पुणे:** पुण्याच्या राजगुरुनगरमध्ये शेजारीच वास्तव्यास असणाऱ्या परप्रांतीय ५४ वर्षीय नराधमाने चिमुकल्या मुलींवर अत्याचार करुन खून केल्याची घटना घडली आहे. या घटनेचा सर्वत्र निषेध नोंदवण्यात येत आहे. दरम्यान, शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या राजगुरूनगरमध्ये पोहचल्या असून त्यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. या घटनेनं पुणे हादरल्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे थेट राजगुरूनगरमध्ये पोहचल्यात. नराधम आरोपी अजय दासच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती घेत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पीडित कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली आहे.

**'मुलींवर अत्याचार थांबवायचे असतील तर...'; उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे नेमकं काय म्हणाल्या?**

राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. यानिमित्ताने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पीडित मुलींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली जाईल, मात्र या मदतीमुळे त्या दोन्ही चिमुकल्या परत येणार नाहीत. यासाठी सरकार कठोर पावले उचलेल, असा विश्वास यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.





आता यापुढे परप्रांतीयांच्या नोंदी ठेवण्याची गरज आहे. सोबतच ते ज्या राज्यातून येतात तिथली त्यांची पार्श्वभूमी पाहणं आवश्यक आहे. त्यासोबतच स्थानिकांनी भाडेकरूंच्या नोंदी ठेवण्यासाठी आग्रह धरायला हवा. चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी व्हायला हवी, यासाठी आम्हीही पाठपुरावा करू. फास्टट्रॅकमध्ये चालणारे खटले पुढे ट्रॅकवर किती फास्ट चालतात, हे पाहणं आणि प्रलंबित प्रकरणं निकाली लावण्यासाठी न्यायालय दोन शिफ्टमध्ये करावीत, अशी मागणी करताना न्यायव्यवस्था सुबक करण्यावर सरकारने भर द्यावा. तसेच, भटक्या विमुक्तांसाठी महामंडळ करावं अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे म्हणत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पीडित कुटुंबीयांना यावेळी आश्वासित केले.

या संतापजनक घटनेनंतर पीडित कुटुंब आणि नातेवाईक आज पोलीस स्टेशन समोर उपोषणासाठी बसले होते. प्रशासनाने लेखी आश्र्वासनही दिले. मात्र, ठोस भूमिका केव्हा पार पाडणार या मागणीसाठी उपोषण सुरूच होते. पण उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विश्वासावर भरवसा ठेवून पीडित कुटुंबीयांनी पाणी पिऊन उपोषण समाप्त केले.

# सरपंच देशमुखांच्या खुनाचे आरोपी १८ दिवसानंतरही मोकाट; बीडचे नागरिक काढणार भव्य मोर्चा

**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडचा बिहार झाल्याची विरोधकाकंडून टीका होत आहे. या हत्या प्रकरणातील आरोपी अद्याप म ोकाट असल्यानं बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सुटत नसल्याचं चित्र निर्माण होत आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आजपर्यंत काय घडलं?

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मासाजोग हे गाव राज्य महामार्ग अहम दनगर-अहमदपूर रस्त्यावर येते. या गावात दळणवळणासाठी मुख्य रस्त्यावर असल्यामुळे कसलीही अडचण नाही. केज तालुका हा अगदी हाकेच्या अंतरावर आहे. अशा ठिकाणी सरपंच संतोष देशमुख यांनी गावाच्या विकासासाठी अनेक योजना आणून राबविल्या होत्या. त्यामुळे गावाच्या विकासात भरदेखील पडली. त्यामुळे संतोष देशमुख नावाजलेलं व्यक्तिमत्व म्हणून ओळखलं जाऊ लागले. प्रत्येक व्यक्तीच्या अडीअडचणीत मदत करणारे म्हणून संतोष देशमुख यांना ओळखलं जात होतं.

तरुणाच्या नोकरीसाठी वाद- पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मस्साजोग गावापासून अगदी एक किलोम ीटर अंतरावर विंडमिल म्हणजे पवनचक्की बनवण्याचे स्टोअर रूम या ठिकाणी कंपनीनं तयार केले. या ठिकाणी काम करण्यासाठी याच भागातील तरुणांना संधी दिली जाते. त्यामुळे या गावातील काही सर्वसामान्य कुटुंबातील तरुण या ठिकाणी नोकरी करत होते. मात्र बाजूच्या असलेल्या डोणगाव या गावातील जयराम चाटे, प्रतीक घुले, महेश केदार, विष्णू चाटे यांनी पवनचक्कीच्या गोडाऊन मालकाशी भेटून त्यांच्या गावातील तरुणांना संधी देण्याची मागणी केली. मात्र, मस्साजोग येथील तरुर अगोदर भरती केल्यामुळे या ठिकाणी जागा नव्हती. तर त्या ठिकाणी आमच्याच लोकांना संधी द्यावी, अशी देखील मागणी विष्णू चाटे यांनी पवनचक्की गोडाऊनच्या मालकाला केली. त्या ठिकाणी संतोष देशमुख यांचा विष्णू चाटे, जयराम चाटे, घुले आणि महेश केदार यांच्याबरोबर वादविवाद झाला.

संतोष देशमुख यांच्याबरोबर त्या दिवशी काय घडलं? दोन दिवसानंतर ९ डिसेंबर २०२४ संतोष देशमुख हे केज येथील पोलीस ठाण्यात गेले. मात्र, पोलिसांनी तक्रार घेतली नाही. त्या ठिकाणी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली. त्या ठिकाणावरून संतोष देशमुख म स्साजोगकडे निघाले. त्यांचा केजवरूनच पाठलाग करण्यात आला. त्यांची गाडी टोल नाक्याजवळ अडवण्यात आली. त्या ठिकाणी त्यांना मारहाण करण्यात आली. गाडीतील संतोष देशमुख यांना ओढून विष्णू चाटे यांनी इतर साथीदारांनी त्यांना गाडीत घेऊन गेले. ही घटना दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली. संतोष देशम ुख यांच्यासोबत त्यांचे चालक असलेले यांनी ताबडतोब येथे त्यांच्या लहान भावाला फोन करून घडलेला प्रकार सांगितला.

# बदलापुरात १९ वर्षीय तरुणीवर रिक्षाचालकाने केले अत्याचार; पीडितेच्या मैत्रिणीने या कृत्यात आरोपीला दिली साथ

दैनिक आपला विदर्भ

**बदलापूर/प्रतिनिधी :** बदलापूरमध्ये एका १९ वर्षीय तरुणीवर रिक्षाचालकाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. धक्कादायक बाब म्हणजे पीडितेच्या मैत्रिणीने आधी तिला मद्य पाजले आणि तिची शुद्ध हरपल्यानंतर या मैत्रिणीच्या रिक्षाचालक मित्राने पीडितेवर अत्याचार केला. पीडित तरुणी ही मुंबईला राहणारी असून ती २१ डिसेंबर रोजी बदलापूरला तिच्या मैत्रिणीला भेटण्यासाठी आली होती. यावेळी बदलापूरच्या मैत्रिणीने दत्ता जाधव या तिच्या रिक्षाचालक मित्रालाही सोबत बोलावून घेतलं आणि या तिघांनी मद्यपान केले. मद्यपान केल्यानंतर पीडित तरुणी शुद्धीत नसल्याचा गैरफायदा घेत रिक्षाचालक दत्ता जाधव याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडित तरुणीच्या मैत्रिणीनेही या कृत्यात त्याची साथ दिली. पीडित तरुणी शुद्धीत आल्यानंतर तिच्या हा प्रकार लक्षात आला. याप्रकरणी तिने २३ डिसेंबर रोजी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि अवघ्या १२ तासात नराधम रिक्षाचालक दत्ता जाधव याला खरवई परिसरातून बेड्या ठोकल्या. पोलीस ज्यावेळेस त्याला अटक करण्यासाठी गेले, त्यावेळेस पोलिसांच्या भीतीने तो बहिणीच्या घरातील लोखंडी कपाटात लपून बसला होता. मात्र पोलिसांनी अतिशय शिताफिने त्याला शोधून काढत बेड्या ठोकल्या आहेत. तर त्याच्या या कृत्यात साथ देणाऱ्या त्याच्या मैत्रिणीलाही पोलिसांनी अटक केल्याची माहिती बदलापूर पूर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर यांनी दिली आहे.



## तारखेत बदल ! फळे भाजीपाला व मसाला पिके स्पर्धा आता २ जानेवारीला

# राष्ट्रीय दुःखवटयामुळे माळेगाव यात्रेतील डॉ.शंकरराव चव्हाण कृषी प्रदर्शन पुढे

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** भारताचे माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांचे निधन झाल्यामुळे २६ डिसेंबर ते १ जानेवारीपर्यंत सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे माळेगाव यात्रेदरम्यान होणाऱ्या डॉ. शंकरराव चव्हाण कृषी प्रदर्शनीच्या नियोजित २९ डिसेंबरच्या उद्घाटन कार्यक्रमात बदल करण्यात आला असून आता हे प्रदर्शन २ जानेवारीपासून सुरू होणार आहे. शेतकऱ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

२६ डिसेंबर ते एक जानेवारीपर्यंत राष्ट्रीय दुखवटा असल्यामुळे डॉ. शंकरराव चव्हाण कृषी प्रदर्शन तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. भारतातील प्रसिद्ध यात्रा माळेगाव येथे सटवाई मंदिराजवळ हे प्रदर्शन दोन ते चार जानेवारी या कालावधीत होणार आहे. माळेगाव यात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांनी हा बदल लक्षात घ्यावा व प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पुरस्कार प्राप्त शेतकरी, स्टॉल धारक तसेच शेतातील फळे भाजीपाला व पिके स्पर्धे साठी आणणाऱ्या स्पर्धकांनी हा बदल तातडीने लक्षात घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

**पिके स्पर्धा २ जानेवारीला**

या प्रदर्शनातील सर्वात महत्त्वाची फळे भाजीपाला व मसाला पिके स्पर्धा २ जानेवारीला होईल. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी हा बदल लक्षात घ्यावा.स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपले फळे, भाजीपाला व मसाला पिकांचे नमुने २ जानेवारी गुरुवारी सकाळी बारा वाजेपर्यंत डॉ. शंकरराव चव्हाण कृषी प्रदर्शनात कृषी विभागाच्या स्टॉलमध्ये आणून ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**सत्कार कार्यक्रम सकाळी ११ वाजता**

या कृषी प्रदर्शनात प्रस्तावित करण्यात आलेला कृषिनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा सत्कार कार्यक्रम देखील दोन जानेवारीला च होणार आहे.कृषीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा सत्कार ठीक सकाळी अकरा वाजता होईल, सर्व संबंधितांनी याची नोंद घेण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

**सकाळी स्टॉल उभारावे**

तसेच प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व स्टाल धारकांनी आपले बियाणे, खते, औषधी, ट्रॅक्टर, शेती उपयोगी अवजारे व इतर सर्व स्टॉल दिनांक २ जानेवारी रोजी सकाळी कृषी प्रदर्शनात उभे करण्याचे आवाहन कृषी विकास अधिकारी सचिन कपाळे यांनी केले आहे. त्यासाठी लवकर कार्यक्रम स्थळी पोहोचण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

**कृषी प्रदर्शन २ ते ४ जानेवारी**

फळे भाजीपाला व मसाले पिके स्पर्धा तसेच कृषीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा सत्कार हा दोन जानेवारी रोजी होत आहे तथापि हे कृषी प्रदर्शन दोन ते चार जानेवारी असे तीन दिवस सुरू असणार आहे तेव्हा नांदेड महानगरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी माळेगाव यात्रेदरम्यान होणाऱ्या या प्रदर्शनाला भेटी द्याव्यात असे आवाहनही कृषी विकास अधिकारी सचिन कपाळे यांनी केले आहे.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू, अमित शहा यांच्या निषेधार्थ सोमवारी

# शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायांचा संयुक्त मोर्चा निघणार

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** परभणीत सोमनाथ सुर्यवंशी या तरुणाचा झालेला मृत्यू आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेले वक्तव्याचा निषेध करण्यासाठी सोमवारी ३० डिसेंबरला ठाण्यात सर्व पुरोगामी, आंबेडकरी पक्ष संघटनांच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती शिव, फुले, शाहू, आंबेडकर अनुयायी मोर्चा नियोजन समितीचे निमंत्रक तथा ज्येष्ठ आंबेडकरी नेते नानासाहेब इंदिसे यांनी दिली.

इंदिसे यांनी सांगितले की, सोमनाथ सुर्यवंशी हा कायद्याचा अभ्यास करणारा विद्यार्थी होता. त्यामुळे तो कायदाबाह्य काम करण्याची शक्यताच नाही. मात्र पोलिसांनी त्याला खोट्या गुन्ह्यात अडकवून कस्टडीत डांबले आणि तिथे बेदम मारहाण केली. या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला. तसा शवविच्छेदनाचा अहवालही परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयाने दिलेला असतानाही पोलिसांनी दिलेल्या खोट्या माहितीच्या आधारे सभागृहात सरकारच्या वतीने चुकीची माहिती देण्यात आली.

या प्रकरणातील पोलीस अधिकाऱ्यांन बडतर्फ करून आयपीसी ३०२ तथा बीएसएस १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी; तसेच, अमीत शहा लोकसभेत द्वेषातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत अपमानकारक विधान केले आहे. मात्र, अद्यापही त्यांनी माफी मागितलेली नाही. त्यांनी देशाची माफी मागावी तसेच त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून त्यांना काढून टाकावे, या मागण्यांसाठी हा मोर्चा आहे. हा मोर्चा सकाळी १०.३० वाजता ठाणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून निघणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज पथमार्गे तलावपाळी येथे शिवरायांना मुजरा करून टेंभी नाका मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या मोर्चाची सांगता होणार आहे. या मोर्चात हजारो लोक सहभागी होतील, असेही नानासाहेब इंदिसे यांनी सांगितले आहे. यावेळी नानासाहेब इंदिसे व इतर अनुयायींच्या वतीने जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.




## महत्त्वाचे...

### नव वर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर; नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर गुन्हे दाखल होणार



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण देश सज्ज असताना ड्रग्स आणि रेव पार्टीवर पोलिसांची करडी नजर असणार आहे.मुंबई नंतर नवी मुंबई परिसरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पार्ट्यांचा आयोजन केले जाते. पनवेल उरण परिसरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये फार्म हाऊसवर नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अनेक पर्यटक दाखल होतात मात्र या पर्यटकांकडून कोणत्याही नियमांचा उल्लंघन होऊ नये,ड्रग्स सेवन होऊ नये,ड्रग्सची विक्री होऊ नये,रेव्ह पार्टीचे आयोजन होऊ नये म्हणून नवी मुंबई पोलीस सज्ज झाले असून साध्या गणवेशातील पोलिस गस्त घालणार आहेत.जर असा कोणयाही अनुचित प्रकार समोर आलाच तर नवी मुंबई पोलीस संबंधित नागरिकांवर गुन्हे दाखल करणार आहेत.नागरिकांनी नवीन वर्षाचे स्वागत जल्लोषाला करावं मात्र कोणत्याही चुकीच्या गोष्टींना बळी पडू नये किंवा त्या करू नयेत अशा प्रकारचा प्रकारचे आवाहन आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केले असून,जर असे कोणतेही पार्टीचे आयोजन केले तर संबंधित व्यक्तींवर गुन्हे दाखल होतील असा इशाराही यावेळी आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिला आहे

### भारताने जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ, मुत्सद्दी संसदपटू गमावले- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशाचे माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग हे जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ, मुत्सद्दी आणि संसदपटू होते. डॉ. सिंग यांच्या निधनाबद्दल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. अर्थमंत्री या नात्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढले आणि जागतिकीकरण व उदारीकरणाच्या मार्गावर नेले. डॉ. मनमोहन सिंग विनम्रता, सौजन्य आणि विद्वत्तेसाठी ओळखले जात. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांमधून त्यांनी संसदेतील चर्चांचा स्तर उंचावला. त्यांच्या निधनामुळे भारताने जागतिक ख्याती लाभलेले अर्थतज्ज्ञ, संसदपटू व विद्वान व्यक्तिमत्व गमावले आहे. या दुःखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांप्रति शोकसंवेदना व्यक्त करतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

### माजी कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीदिनी मंत्रालयात अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशाचे माजी कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीदिनी मंत्रालयात पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव सचिन कावळे, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे, नितीन राणे आदीसह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### डॉ. पंजाबराव देशमुख यांना राज्यपालांचे अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचे माजी कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राजभवनातील अधिकारी व कर्मचारी तसेच राजभवन येथे तैनात असलेले पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने प्रशासक, अर्थतज्ज्ञ गमावला - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचे माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने एक उमदा प्रशासक, अर्थतज्ज्ञ गमावला आहे, अशी शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री, प्रधानमंत्री अशा विविध भूमिकांमधून त्यांनी काम केले आणि देशवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या राजकारणात स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण केले. अर्थशास्त्राशी संबंधित विपूल लेखन सुद्धा त्यांनी केले. त्यांनी केलेले कार्य देशवासियांच्या कायम स्मरणात राहील. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या आणि चाहत्यांच्या दु:खात मी सहभागी आहे. हे दु:ख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना लाभो, अशी मी प्रार्थना करतो.

# आमदार मनोज कायंदे यांचा एक कॉल आणि मॅटर सॉल

## मतदारसंघातील समस्येसाठी आमदार ॲक्शन मोडवर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप





**बिबी :** सतत शेतकरी कुठल्या ना कुठल्या कारणाने नेहमीच अडचणीत असल्याने शेतकऱ्याला नाहक त्रास भोगाव लागतो पळसखेड चक्का येथील गेल्या एक वर्षापासून शेतामध्ये डीपी बंद अवस्थेमध्ये होती म्हणून शेतकऱ्याचे खरीपचे पीक तर गेलेच पण रब्बीचे पीक सुद्धा हातामधून जाणार असल्याने शेतकरी हवालदिल झाला होता म्हणून शेतकरी पळसखेड चक्का येथील दिनांक २३ डिसेंबर रोजी आमदार श्री मनोज कायंदे यांची भेट घेतली आणि त्यांना सगळ्या समस्या समजून सांगितल्या आणि शेतकऱ्याला रब्बी पिकाला लाईट नसल्यामुळे पीक हातातून जाणार आहे असे सांगितल्यानंतर लगेच त्यावर त्यांनी लगेच अधिकाऱ्याला सूचना देऊन पळसखेड चक्का तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा चक्का येथील डीपी ताबडतोब बसवा असे आदेश दिल्यानंतर आज दिनांक २७ डिसेंबर रोजी येथील डीपी बसवण्यात आल्यामुळे येथील शेतकऱ्यांच्या मनामध्ये एक आनंद व्यक्त करण्यात येत आहे

आता रब्बीचे पीक शेतकऱ्यांची गहू हरभरा शाळु आणि बीज उत्पादक शेतकरी शेडनेट यांना आणि या शेतकऱ्यांना मिळाला दिलासा यावेळी उपस्थित शेतकरी शेतकरी योद्धा कृती समिती चे समन्वय श्री बालाजी सोसे, श्री अर्जुन मुंडे साहेब, श्री गणेश सोसे ग्रामपंचायत सदस्य, पांडुरंग सोसे, प्रमोद नागरे, राहुल आंधळे, धनंजय सोसे, आधी शेतकरी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### धनोजे कुणबी समाज मंदिर तर्फे कृषी महोत्सवाचे आयोजन





दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर येथील धनोजे कुणबी समाज मंदिराच्या वतीने चंद्रपूर येथे तीन दिवसीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विचारमंथन, सरपंच परिषद, उद्योजकता मार्गदर्शन, आणि वधू-वर परिचय मेळाव्यासह बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्पादित साहित्याचे प्रदर्शन राहणार आहे. चांदा क्लब ग्राऊंड येथे दिनांक २७ ते दिनांक २९ डिसेंबरला कृषी महोत्सव तसेच धनौजे कुणबी उपवर-वधू परिचय मेळावा होणार आहे. आज कृषी महोत्सव व उपवर-वधू परिचय मेळाव्याचे उद्घाटन खासदार प्रतिभा धानोरकर, राजुरा विधानसभेचे आमदार देवराव भोंगळे यांच्या हस्ते झाले. या कृषी महोत्सवामध्ये शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती फायद्याची कशी करता येईल यासाठी तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत. नवीन तरुण हे उद्योजक बनले पाहिजे यासाठी समाजाने पुढाकार घेतला आणि सरपंच परिषदेच्या माध्यमातून सुद्धा सर्व सरपंचांना एकत्रित करून त्यांना गावाच्या विकासाचा मंत्र देण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे राजुरा विधानसभेचे आमदार देवराव भोंगळे व ॲड. पुरूषोत्तम सातपुते यांनी म्हटले आहे.

### माजी सैनिक व विधवांच्या पाल्यांसाठी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** माजी सैनिक, विधवांच्या पाल्यांसाठी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. ज्यांनी काही कारणास्तव प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजनाचे (झचडड) फॉर्म वेळेवर भरले नाही, अशा सर्व माजी सैनिक, विधवा पत्नी, युद्ध विधवा यांच्यासाठी अर्ज सादर करण्याची लिंक दि. ३० डिसेंबर २०२४ ते दि. ३ जानेवारी २०२५ पर्यंत पुन्हा उघडण्यात येत आहे. तरी माजी सैनिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी रूपाली पांडूरंग सरोदे यांनी केला आहे.

### भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन, सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारत सरकारने दु:ख व्यक्त करत भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाची घोषणा केली आहे. त्यांचे निधन २६ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात झाले.

डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दुखवटा २६ डिसेंबर २०२४ पासून १ जानेवारी २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) पाळला जाईल. या काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल आणि कोणतेही शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत. डॉ. मनमोहन सिंग यांना शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. तसेच, त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश-विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.

## रस्तालूट करणाऱ्यांच्या धुळे तालुका पोलिसांनी २४ तासांच्या आत आवळ्या मुसक्या

दैनिक आपला विदर्भ



**धुळे/प्रतिनिधी :** नाशिक येथून एका कारमध्ये आलेल्या तरूणास विटेचा धाक दाखवित लुटल्याची घटना काल रात्रीच्या सुमारास बाळापूर शिवारात घडली होती. या घटनेत तेजस सोनवणे या तरुणाकडील एका महागड्या मोबाईलसह तीन हजारांची रोकड मिळून एकूण ३६ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल लूटारूने नेला होता, यासंदर्भात धुळे तालुका पोलीस ठाण्यात घटनेची नोंद होताच धुळे तालुका पोलिसांनी तपासाची चक्रे गतीमान करीत या जबरी चोरीतील चोरट्यास मुद्देमालासह २४ तासांच्या आत जेरबंद केले.

तेजरा महेंद्र सोनवणे, रा. दापोरे, जि. जळगाव हा तरूण त्याचे ताब्यातील कारने नाशिक येथुन येत होता. रस्त्यात त्यास झोपेची डुलकी लागल्याने त्याने बाळापूर शिवारातील हॉटेल कल्पेश जवळ कार उभी करून झोपला असताना त्या ठिकाणी एक तरुण आला आणि आपल्या हातातील विटेचा धाक दाखवून त्याचा कारचा दरवाजा उघडून त्याची लूट करून फरार झाला होता. यानंतर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आणि पोलिसांनी लागलीच तेजस सोनवणे यांनी सांगितलेल्या वर्णन वरून वसीम उर्फ वड्या रंगरेज याला तालुका पोलिसांनी अवघ्या २४ तासाच्या आत बेड्या ठोकण्यात यश आले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालयात भाऊसाहेब ऊर्फ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त प्रभारी जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, नायब तहसीलदार प्रमोद करे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर आदींनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## चंद्रपूर मनपा व डॉ.खत्री महाविद्यालयांत सामंजस्य करार; पर्यावरण संवर्धनासाठी करणार जनजागृती

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर महानगरपालिका व डॉ.खत्री महाविद्यालयात सामंजस्य करार करण्यात आला असुन याअंतर्गत वृक्षलागवड, रेन वॉटर हार्वे स्टींग व घनकचरा व्यवस्थापन या पर्यावरण विषयक महत्वाच्या विषयांवर जनजागृती करण्यात येणार आहे.

मनपा आयुक्त विपीन पालीवाल व डॉ.खत्री महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने झालेल्या या सामंजस्य करारानुसार मनपातर्फे राबविण्यात येणाऱ्या वृक्षलागवड, रेन वॉटर हार्वेस्टींग व घनकचरा व्यवस्थापन, ई वाहने,प्लास्टीक बंदी,कंपोस्ट खत तयार करणे इत्यादी उपक्रमांविषयी आता डॉ.खत्री महाविद्यालयातर्फे जनजागृती करण्यात येणार आहे.

शासन निर्देशानुसार चंद्रपूर मनपातर्फे पर्यावरण विषयक महत्वाच्या सर्व विषयांवर विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. या स्पर्धा, उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग असणे महत्वाचे असते,कारण जनसहभागातूनच पर्यावरण संवर्धन व रक्षण करणे शक्य आहे. प्रशासनाच्या प्रयत्नांना जर नागरिकांची साथ मिळाली तर कोणताही उपक्रम यशस्वी होणे शक्य होते.




मनपातर्फे दर महिन्यास पर्यावरण विषयक उपक्रमांची जनजागृती करण्याचे ठराविक लक्ष महाविद्यालयास देण्यात येणार असुन महाविद्यालयातर्फे योजनाबद्ध रीतीने परिणामकारक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे व केलेल्या कामांची माहिती मनपास देण्यात येणार आहे.महाविद्यालयांच्या सहभागाने युवा वर्गाचा पर्यावरण संरक्षण व संवर्धनात सहभाग होणार असुन याचप्रकारे इतर महाविद्यालयांनीही सहयोग करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

## नायलॉन मांजा निर्मिती, वापर व विक्री करणाऱ्यावर होणार कार्यवाही

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मकर संक्रांतीच्या अगोदर व नंतर काही दिवस पतंग उडविण्याचे प्रमाण जास्त असते. त्यासाठी नायलॉन मांजा (दोरा) या धाग्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तसेच या मांजामुळे मानवी जीवितास, पशु-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होऊन जखमी व मृत होण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. पर्यावरण अधिनियमानुसार संपूर्ण जिल्ह्यात नायलॉन मांजाचा वापर, विक्री व निर्मिती करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणुकदार यांना नायलॉन मांजाची विक्री व साठवणुक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस विभाग यांनी स्वतंत्ररित्या पथके तयार करुन आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर आदेशाचे कोणतीही व्यक्ती वा संस्था यांनी उल्लंघन केल्यास पर्यावरण(संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र राहिल, असे जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद आहे.

## नंदुरबारमध्ये आज भव्य गोल रिंगण सोहळ्यासह फिरता नारळीय कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार /प्रतिनिधी :** नंदुरबार येथे २८ डिसेंबर शनिवार रोजी फिरता नारळीय कार्यक्रम व भव्य गोल रिंगण सोहळाचे आयोजन शहरातील जी टी पाटील महाविद्यालयात करण्यात आले आहे. शहिदांची भूमी नंदनगरी ग्रामस्थ व हरिभक्त पारायण माऊली भजनी मंडळातर्फे संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पदयात्रा सोहळा निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी जय्यत तयारी करण्यात आली असून संपुर्ण महाराष्ट्र सह गुजरात ,मध्यप्रदेश येथील जवळपास ४० हजार भाविक उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सकाळी ११ ते २ माऊलींचे रथ व पादुकांची शोभायात्रा निघणार असून ३ ते ५ भव्य गोल रिंगण सोहळा होणार आहे. त्यानंतर हरिपाठ, गीता पाठ, व हरिनाम जप यांचे आयोजन होणार आहे.

नंदुरबार जिल्ह्यात २२ वर्षानंतर पहिल्यांदाच हा रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून जवळपास ७५ क्विंटल चा महाप्रसाद तयार करण्यात येणार आहे. हा गोल रिंगण सोहळा कार्यक्रम नंदुरबार जिल्हात प्रथमताच होत असल्याने भाविक मोठ्या संख्येने येण्याची शक्यता आहे .त्या दृष्टिकोनातून संपूर्ण तयारी भजनी मंडळ व आयोजकांकडून करण्यात आली आहे.



## शेतकऱ्यांनी नुकसान झाल्याचं सांगितल्याशिवाय अनावश्यक पंचनामे करण्याची गरज काय?- कोकाटे

दैनिक आपला विदर्भ

**अकोला /प्रतिनिधी :** शेतकऱ्यांनी नुकसान झाल्याचं सांगितल्याशिवाय अनावश्यक पंचनामे करण्याची गरज काय?, असा प्रश्न राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केला आहे. मंत्री माणिकराव कोकाटे अकोल्यात कृषी विद्यापीठाच्या तीन दिवसीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

दरम्यान, कृषी विद्यापीठातील स्टॉल धारकांना विद्यापीठाने शुल्क आकारण्याच्या प्रश्नावरही ते म्हणाले की लोकसहभागातूनच कोणतेही काम पूर्णत्वास जाते.



सरकारने फुकट दिले तर मग काहीच काम करायचं नाही का?, असा सवाल त्यांनी केला आहे. आज अकोल्याच्या कृषी विद्यापीठातील कृषी प्रदर्शन उद्घाटनाचा कार्यक्रम माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे रद्द करण्यात आला. यावेळी कृषीमंत्र्यांनी मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली वाहिली.

आज झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले की नाही हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे पंचनामे संदर्भात सध्या कोणताही निर्णय घेणार नसल्याचे कृषिमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील कृषिमंत्री पदाचा कारभार सांभाळल्यानंतर कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंनी प्रथमच अकोल्यातील कृषी विद्यापीठाला भेट दिली. दरम्यान राज्यातील कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठातील रिक्त जागांसंदर्भात लवकरच माहिती घेऊन निर्णय घेऊ असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

दरम्यान आपल्या नाशिकच्या पालकमंत्रीपदाबद्दल मुख्यमंत्रीच निर्णय घेतील आणि छगन भुजबळांच्या नाराजीबद्दल वरिष्ठ निर्णय घेतील असे देखील त्यांनी म्हटले आहे.

